राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य व उद्योजकता विकास (Skill and Entrepreneurship Development) तसेच क्षमता वृद्धींगत (Capacity Building) करण्यासंदर्भातील योजनांचे एकसूत्रिकरण (Convergence) करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१८/प्र.क्र.१२४/अभियान-१,**
**दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : २० ऑगस्ट, २०१९**

**वाचा** : १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एईओ-१०१५/ प्र.क्र.०६/२०१५/दहा, दिनांक १५/०१/२०१५.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.१४९/अभियान-१, दिनांक ०५/०४/२०१८.

**प्रस्तावना :**

कौशल्य विकास अभियानाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची स्थापना करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) या नोडल एजन्सीद्वारे राज्यात कौशल्य व उद्योजकता विकासाच्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजना/कार्यक्रमांचे संनियंत्रण, नियोजन व अंमलबजावणी करण्यात येते.

राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण तसेच क्षमता वृध्दींगत (Capacity Building) करण्यासंदर्भात विविध योजना/कार्यक्रम राबविण्यात येतात. सदर योजनांचे पुनरावलोकन करून द्विरूक्ती टाळण्यासाठी योजनांचे सुसुत्रिकरण (Convergence) करण्याकरिता विभागाच्या दिनांक ०५/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव, उद्योग यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणारे कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण तसेच क्षमता वृध्दींगत करण्यासंदर्भातील योजनांचे एकसूत्रिकरण (Convergence) करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १३/०८/२०१९ रोजी मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. मा.मंत्रिमंडळाने दिनांक १३/०८/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणारे कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण तसेच क्षमता वृध्दींगत करण्यासंदर्भातील योजनांचे एकसूत्रिकरण (Convergence) करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

वरील प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार शासन याद्वारे, राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण तसेच क्षमता वृध्दींगत

(Capacity Building) करण्यासंदर्भातील योजना/कार्यक्रम खालील पद्धतीने राबविण्यास मान्यता देत आहे.

१. राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य व उद्योजकता विकास (Skill and Entrepreneurship Development) तसेच क्षमता वृद्धींगत (Capacity Building) करण्यासंदर्भातील योजना National Skill Qualification Framework (NSQF) सुसंगत असणे अनिवार्य राहील.

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) च्या एकात्मिक वेबपोर्टलवर उपलब्ध असलेले अभ्यासक्रम राबविणे अनिवार्य राहील. तथापि, पोर्टलवर उपलब्ध असलेल्या अभ्यासक्रमांव्यतिरिक्त इतर (Customised) अभ्यासक्रम संबंधित विभागास राबवावयाचे असल्यास अभ्यासक्रम तयार करुन त्यास महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (MSCVT) यांची मान्यता घेणे अनिवार्य राहील.

३. पोर्टलवर उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण संस्थांमार्फत अभ्यासक्रम राबविणे अनिवार्य राहील. तथापि, पोर्टलवर संबंधित अभ्यासक्रमाकरिता प्रशिक्षण संस्था उपलब्ध नसल्यास अथवा वेबपोर्टलवर नोंदणीकृत नसलेल्या संस्थेमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास संबंधित विभाग इच्छूक असल्यास सदर प्रशिक्षण संस्थेने प्रथम महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (MSCVT) यांचेकडे नोंदणी करणे आवश्यक राहील.

४. प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) मार्फत राबविण्यास संबंधित विभाग इच्छूक असल्यास प्रशिक्षण व मूल्यमापन शुल्काची अनुज्ञेय रक्कम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) कडे २% प्रशासकीय शुल्कासह आगाऊ जमा करणे आवश्यक राहील.

५. प्रशिक्षण शुल्कापोटी अनुज्ञेय रक्कम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) कडे २% प्रशासकीय शुल्कासह आगाऊ जमा करण्याची अथवा संबंधित प्रशिक्षण संस्थेस थेट अदा करण्याची मुभा संबंधित विभागास राहील.

६. संबंधित विभाग प्रशिक्षण कार्यक्रम राबविणार असल्यास प्रशिक्षणाचे व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) च्या एकात्मिक वेबपोर्टलद्वारे करणे बंधनकारक राहील. तसेच प्रशिक्षण शुल्काच्या ०.५% रक्कम (वेबपोर्टल शुल्क) व मुल्यमापन शुल्काची रक्कम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) कडे जमा करणे आवश्यक राहील.

७. प्रशिक्षण संस्था निवडीचे अधिकार संबंधित उमेदवारास राहतील.

८. कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे अस्तित्वात असलेल्या अथवा प्रस्तावित योजनांमध्ये कामांची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी तसेच संबंधित विभागांनी घ्यावी.

९. उपरोक्त कार्यपद्धती अनुसरण्यासाठी आवश्यक ते बदल संबंधित विभागांनी त्यांच्या योजना/कार्यक्रमांच्या शासन निर्णयात करावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८२११२४५११८४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=34e795101cfc08377272f409bc9348c5d84ec89bc33bd49bcb71e896a5e56b29, serialNumber=eb1cb39de10fe09852a24a5fa63add6d5b204146d3716e740e20fb4b2a378a55, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2019.08.21 13:02:31 +05'30'

**( स. दि. खरात )**
उप सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. निवड नस्ती. (अभियान-१)